# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

Dr. Priya Gedam
Director Students' Development(I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/DSW / 952/2019 Dt: 27/06/2019

प्रति,
मा. प्राचार्य / विभाग प्रमुख
संलग्नीत सर्व महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय : महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद व विद्यापीठ विभागीय विद्यार्थी परिषद निवडणुकीसाठी निवडणुक अधिकारी नियुक्त करण्याबाबत.

सादर,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, क्रमांक परीनियम - २०१८/ प्र.क्र. ८१/विशि - २, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) यांच्या कलम ९९ च्या पोट कलम (११) व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ - ब, सन २०१८ च्या एकरूप परीनियम ५,६,७ याद्वारे विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांच्या संबधात निवडणुक घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुक घेण्यासाठीच्या यंत्रना, उमेदवार आणि निवडणुक प्रशासन यांच्या करीता आचारसंहीता आणि तक्रार निवारण यंत्रना तयार केली आहे. तसेच दिनांक ३१ सप्टेंबर २०१९ रोजी पर्यत विद्यापीठ विद्यार्थी परिषद स्थापन करणे अनिवार्य असल्याने निवडणूक अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार चार - ब, खंड क्र. ८ नुसार महाविद्यालय किवा परिसंस्थेच्या बाबतीत, अध्यापकास त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अनुक्रमे प्राचार्याद्वारे किंवा संचालकाद्वारे निवडणूक अधिकारी म्हणून नामनिर्देशन करून संलग्न प्रपत्राप्रमाणे माहीती भरून मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे दिनांक ०१ जुलै २०१९ पर्यत माहीती सादर करावी ही विनती.

धन्यवाद!

संलग्न :— प्रपत्र

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# Gondwana university, Gadchiroli

| Name of the college | Name of the principal | Name of the Election officer | Email I.D. | Contact No. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक १३८(२)] शुक्रवार, ऑक्टोबर २६, २०१८/कार्तिक ४, शके १९४० [पृष्ठे २६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर २०१८

आदेश

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

क्रमांक परिनि-२०१८/प्र.क्र.८१/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ९९ च्या पोट-कलम (११) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांच्या संबंधात निवडणुका घेण्याची कार्यपद्धती, निवडणूक घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेण्यासाठीची यंत्रणा, उमेदवार आणि निवडणूक प्रशासक यांच्याकरिता आचारसंहिता, आणि तक्रार निवारण यंत्रणा यांकरिता पुढीलप्रमाणे विनिर्देश करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व व्याप्ती .**— (१) या आदेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत निवडणुका घेण्याची कार्यपद्धती, निवडणुका घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेण्यासाठीची यंत्रणा, उमेदवार आणि निवडणूक प्रशासन यांच्याकरिता आचारसंहिता आणि तक्रार निवारण यंत्रणा) आदेश, २०१८, असे म्हणावे.

(२) हा आदेश २९ ऑक्टोबर २०१८ रोजी अंमलात येईल.

२. **व्याख्या.**— (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ,—

(क) ''अधिनियम'' याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा- ६) असा आहे ;

(ख) ''वर्ग'' याचा अर्थ, विशिष्ट वर्षासाठी असलेल्या पूर्णवेळ पाठ्यक्रमाच्या प्रत्येक तुकडीच्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश असणारा एक गट, असा आहे ;

(ग) ''महाविद्यालय विद्यार्थी परिषद'' याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (३) च्या तरतुदींनुसार घटित केलेली महाविद्यालय विद्यार्थी परिषद, असा आहे ;

(घ) ''निरंतर उमेदवार'' याचा अर्थ, मत मोजणीच्या कोणत्याही दिलेल्या टप्प्यावर मतदानामधून निवडलेला नाही किंवा वगळलेला नाही असा कोणताही उमेदवार, असा आहे ;

(ङ) ''मोजणी'' याचा अर्थ, उमेदवारांकरिता नोंदवलेल्या पहिल्या पसंतीच्या मोजणीमध्ये अंतर्भूत असलेली सर्व कार्ये ; किंवा निर्वाचित उमेदवाराची अधिकची मते हस्तांतरित करण्यात अंतर्भूत असलेली सर्व कार्ये, किंवा वगळलेल्या उमेदवाराची किंवा एकत्रितपणे वगळलेल्या दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांची मते हस्तांतरित करण्यात अंतर्भूत असलेली सर्व कार्ये असा आहे ;

(च) महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या संदर्भात ''निवडणूक अधिकारी'' याचा अर्थ, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी किंवा मान्यताप्राप्त संस्थेच्या संचालकाने नामनिर्देशित केलेला अध्यापक आणि विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेच्या व विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या संदर्भात, विद्यार्थी विकास संचालकाने नामनिर्देशित केलेला अध्यापक, असा आहे ;

(छ) ''निवडणूक कार्यक्रम'' याचा अर्थ, निवडणुकीच्या कार्यक्रमाचे दिनांकनिहाय वेळापत्रक, असा आहे व त्यात कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक, नामनिर्देशन भरण्याचा दिनांक, नामनिर्देशन मागे घेण्याचा दिनांक, निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी प्रदर्शित करण्याचा दिनांक, निवडणुकीचा दिनांक, मतमोजणीचा दिनांक आणि निकाल घोषित करण्याचा दिनांक आणि निवडणूक अधिकाऱ्याने तयार केलेला आणि प्रसिद्ध केलेला असा इतर तपशील, याचा समावेश असेल ;

(ज) ''पहिला पसंतीक्रम'' याचा अर्थ, मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोर केवळ अंक ''१'' नमूद करणे असा आहे, ''दुसरा पसंतीक्रम'' याचा अर्थ, मतपत्रिकेवर अंक ''१'' च्या नंतर येणाऱ्या उमेदवाराच्या नावासमोर केवळ अंक ''२'' नमूद करणे, असा आहे ''तिसरा पसंतीक्रम'' याचा अर्थ, मतपत्रिकेवर नावासमोर अंक ''१'' आणि अंक ''२'' च्या नंतर केवळ अंक ''३'' नमूद करणे, असा आहे ;

(झ) ''पूर्णवेळ पाठ्यक्रम'' याचा अर्थ, विद्यापीठाने मान्यता दिलेला पदवी किंवा पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम, असा आहे, पण त्यात इतर कोणताही प्रमाणपत्र / पदविका पाठ्यक्रम, जोड पाठ्यक्रम, दूरस्थ पद्धती/बाह्य पद्धतीमधील कोणताही शैक्षणिक अध्ययनक्रम आणि महाविद्यालयाने किंवा संस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने दिलेला इतर कोणताही स्वायत्त पाठ्यक्रम यांचा समावेश असणार नाही ;

(ञ) ''पुढील उपलब्ध पसंतीक्रम'' याचा अर्थ, निरंतर उमेदवारासाठी सलग संख्याक्रमामध्ये नोंदविलेला दुसरा किंवा त्यानंतरचा पसंतीक्रम, असा आहे; यापूर्वीच निवडून आलेल्या किंवा वगळलेल्या उमेदवारांकरिता मतपत्रिकेवर क्रमाने लगतचे, पसंतीक्रम हिशेबात घेतले जाणार नाहीत ;

(ट) ''अहस्तांतरणीय पत्रिका'' याचा अर्थ, ज्या मतपत्रिकेवर निरंतर उमेदवारासाठी दुसरा किंवा त्यानंतरचा पसंतीक्रम नोंदविलेला नाही किंवा दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांची नावे (मग ती निरंतर असो किंवा नसो) समान क्रमांकाने चिन्हांकित केली आहेत आणि पसंतीक्रम लगतचा आहे; किंवा लगतचा पसंतीक्रम नोंदवलेल्या उमेदवाराचे नाव (मग ती निरंतर असो किंवा नसो) मतपत्रिकेवर इतर कोणत्याही क्रमांकानंतर सलगपणे नसलेल्या क्रमांकाने चिन्हांकित केला आहे ; किंवा दोन किंवा अधिक क्रमांकाने चिन्हांकित केले आहे किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता निरंतर उमेदवाराकरिता मतदाराने नोंदवलेला पुढील उपलब्ध पसंतीक्रम निर्धारित केला जाऊ शकत नाही, अशी मतपत्रिका, असा आहे ;

(ठ) कोणत्याही उमेदवाराबाबतीत ''मूळ मत'' याचा अर्थ, ज्या मतपत्रिकेवर त्या उमेदवारासाठी पहिला पसंतीक्रम नोंदविला आहे त्या मतपत्रिकेतून प्राप्त झालेले मत, असा आहे ;

(ड) निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा) याचा अर्थ, त्या निवडणुकीत भरावयाची रिक्त पदांची संख्या अधिक एक याने निवडणुकीत मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येस भागून येणारे उत्तर अधिक एक या सूत्रानुसार निर्धारित केलेली उमेदवारास निवडून येण्यासाठी आवश्यक मतसंख्या, असा आहे आणि अशाप्रकारे आलेल्या निकालातील अपूर्णांक वगळण्यात येईल,

उदाहरणार्थ :–

$$\text{निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा)} = \frac{\text{वैध मतांची एकूण संख्या}}{\text{रिक्त पदांची संख्या} + १} + १$$

उदाहरण :– रिक्त पदांची संख्या = ५

वैध मते = १००

$$\text{निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा)} = \frac{१००}{५+१} + १$$

$$= १६.६७ + १$$

$$= १७$$

(१७.६७ हा १८ अशा पूर्णांकात घेण्यात येणार नाही. कारण अगोदरच तो १६.६७ मध्ये "१" मिळवला आहे) ;

(ढ) "अधिकची मते" याचा अर्थ, कोणत्याही उमेदवाराला मिळालेल्या मूळ व हस्तांतरित मतांची एकूण संख्या ही निवडून येण्यासाठी आवश्यक असलेल्या (कोटा) मतांच्या संख्येपेक्षा अधिक होत असेल अशी मतांची संख्या, असा आहे ;

(ण) "हस्तांतरित करावयाची मतपत्रिका" याचा अर्थ, निरंतर उमेदवाराकरिता लागोपाठच्या संख्याक्रमानुसार पहिला, दुसरा किंवा त्यानंतरचा लागोपाठचा पसंतीक्रम नोंदवलेली मतपत्रिका, असा आहे ;

(त) कोणत्याही उमेदवाराच्या बाबतीत "हस्तांतरित मत" याचा अर्थ, त्या उमेदवारासाठी दुसऱ्या किंवा लागोपाठच्या पसंतीक्रमाची नोंदणी केलेल्या अशा मतपत्रिकांतून प्राप्त झालेली मते, असा आहे ;

(थ) "विद्यापीठ विद्यार्थी संघ" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (४) (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेला विद्यापीठ विद्यार्थी संघ, असा आहे ;

(द) "विद्यापीठ विद्यार्थी परिषद" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (४) (ख) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, असा आहे ;

(ध) "विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेली विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद, असा आहे.

(२) या आदेशात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या अधिनियमात त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. **विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीकरिता प्राधिकरण.—** (१) महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त संस्थेचा संचालक हा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीकरिता प्राधिकारी असेल.

(२) संचालक, विद्यार्थी विकास हा विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यांचा निवडणुकीचा प्राधिकारी असेल.

४. **मतांची वैधता आणि निवडणुकीचा निकाल यासंबंधात निर्णय घेण्याचे निवडणूक अधिकाऱ्याचे अधिकार.—**(१) निवडणूक अधिकाऱ्याला, संदिग्धता वाटत असेल त्याबाबतीत, नोंदवलेल्या मताची वैधता किंवा अवैधता याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

(२) निवडणूक अधिकाऱ्याला प्रत्येक निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याचा अधिकार असेल.

५. **निवडणूक कार्यक्रम.—** (१) संचालक, विद्यार्थी विकास,—

(एक) कुलगुरुबरोबर विचारविनिमय करून निवडणूक कार्यक्रम तयार करील. निवडणूक कार्यक्रमामध्ये निवडणुका घेणे, अधिसूचना काढणे, प्रसिद्धी आणि निवेदने यासंबंधातील सर्व कार्यक्रमांच्या सविस्तर वेळापत्रकाचा अंतर्भाव असेल आणि तो संबंधित शैक्षणिक वर्षाच्या ३१ जुलै रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येईल ;

(दोन) शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी किंवा त्यापूर्वी विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित करण्यात येईल, याची खात्री करील.

(तीन) कुलगुरूंशी विचारविनियम केल्यानंतर, अधिनियमाच्या कलम ९९ (३) (घ) अन्वये आवश्यकता असल्याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाकरिता आरक्षणाचा प्रवर्ग चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्याची प्रक्रिया हाती घेईल आणि या प्रक्रियेची निष्पत्ति, निवडणूक कार्यक्रमाबरोबरच प्रत्येक महाविद्यालयासाठीच्या आरक्षणाच्या प्रवर्गाच्या सूचीच्या स्वरूपात घोषित करण्यात येईल.

(२) सर्व महाविद्यालये किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ विभाग यांमध्ये निवडणूक त्याच कार्यालयीन दिवशी घेण्यात येत आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी, विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद व महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांच्या निवडणुका घेण्यासाठी एक सामाईक वेळापत्रक असेल.

(३) यथोचितरीत्या घटित केलेल्या विद्यापीठ विद्यार्थी संघाचा (म्हणजे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठीचा निर्वाचक गण) अधिकृत प्रसिद्धीचा दिनांक आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषदेची निवडणूक दिनांक यादरम्यान किमान पूर्ण दहा दिवसांचे अंतर असेल.



Carmel / Lifi Luchinent

६. **निवडणूक लढविण्याकरिता पात्रता.**— (१) उमेदवार हा, ज्याने महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने देऊ केलेल्या, विद्यापीठाच्या पूर्णवेळ मान्यताप्राप्त पाठ्यक्रमासाठी शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेली आहे व प्रवेश घेतलेला आहे असा पूर्णवेळ नियमित विद्यार्थी असावा.

(२) उमेदवाराने, मागील कोणताही विषय शिल्लक न ठेवता आणि / किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याची मुभा (एटीकेटी) न घेता अगोदरच्या वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण केलेले असले पाहिजेत.

(३) विद्यार्थी हा, एकाच वर्गात पुनः प्रवेश घेतलेला विद्यार्थी नसावा.

(४) निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही, त्या शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी त्यांच्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण, एवढी असावी.

(५) राखीव प्रवर्गाच्या प्रतिनिधीसाठी निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराकडे निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

७. **निवडणूक लढविण्यासाठी अनर्हता.**—जर एखाद्या विद्यार्थ्याने,—

(१) उच्च शिक्षणासाठी पहिल्यांदा प्रवेश घेतल्यापासून सात शैक्षणिक वर्षे पूर्ण केलेली असतील; किंवा

(२) त्यास कोणत्याही विद्यापीठ परीक्षेतील गैरप्रकारामध्ये गुंतल्यामुळे किंवा कोणतीही गैरवर्तणूक केल्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याने शिक्षा केलेली असेल ; किंवा

(३) त्यास नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाकरिता दोषी ठरविलेले असेल,—

तर तो विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास हक्कदार असणार नाही.

८. **निवडणुकीची प्रक्रिया.**—(१) महाविद्यालय किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, अध्यापकास त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अनुक्रमे प्राचार्याद्वारे किंवा संचालकाद्वारे निवडणूक अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात येईल. विद्यापीठाच्या बाबतीत, प्र-कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर संचालक, विद्यार्थी विकास याच्याकडून निवडणूक अधिकारी म्हणून अध्यापकास नामनिर्देशित करण्यात यईल. निवडणूक अधिकारी, वर्गप्रतिनिधी निवडण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिताचा निर्वाचक गण आणि संबंधित विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी निवडण्यासाठी त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा अंतर्भाव असणारा विद्यार्थी निर्वाचक गण यांची तात्पुरती व अंतिम सूची तयार करील व प्रसिद्ध करील. अशा मतदार यादीची एक प्रत विद्यापीठाच्या, महाविद्यालयाच्या किंवा यथास्थिति, परिसंस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. अशा मतदार यादीची छापील प्रत देखील उमेदवारांना वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) मतदान मतपत्रिकेद्वारे होईल. मतपत्रिकेवर आडनावांनी सुरू होणारी उमेदवारांची नावे इंग्रजी वर्णानुक्रमाने नमूद करण्यात येतील.

(३) वर्ग प्रतिनिधि व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेला, किंवा, यथास्थिति, महाविद्यालय विद्यार्थी परिषदेला निवडून द्यावयाचे अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यांकरिता वेगळ्या मतपेट्या असतील.

(४) विद्यार्थ्याला, संबंधित वर्ग प्रतिनिधी व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेला किंवा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेला निवडून द्यावयाचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यासाठी स्वतंत्रपणे मत देण्याचा हक्क असेल, म्हणजेच विद्यार्थ्याला एकूण कमाल पाच मते देण्याचा हक्क असेल.

(५) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेसाठीची व महाविद्यालय विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक, सरळ बहुमताच्या तत्त्वानुसार घेण्यात येईल.